पुणे महानगरपालिका

*** स्थायी समिती ***

**कार्यपत्रिका क्रमांक ११**

स्थायी समितीची साप्ताहिक सभा **मंगळवार दि. १६/६/२०२०** रोजी सकाळी ११:०० (अकरा) वाजता **स्थायी समिती सभागृह, दुसरा मजला, पुणे महानगरपालिकेची नवीन विस्तारीत इमारत येथे भरेल.**

सदर सभेत खालील विषयांचा विचार होईल.

**वृत्तांत कायम करणे.**

**उप आयुक्त, विभागीय कार्यालय यांचे कामकाजाचा आढावा**

**विषय क्र. २२०**

उप आयुक्त, परिमंडळ क्र. ३ कार्यालयाचे नियंत्रणाखालील सिंहगडरोड, धनकवडी–सहकारनगर व वारजे-कर्वेनगर क्षेत्रिय कार्यालयांकडील दि. १/२/२०२० ते दि. २९/२/२०२० पर्यंतच्या कामकाजाचा मासिक अहवाल निदर्शनास आणणेबाबत मा. उप आयुक्त, परिमंडळ क्र. ३ यांचे जा.क्र. उआप–३/१०५६८ दि.३१/३/२०२० चे पत्र.

**मागील सभेचे विषय**

**विषय क्र. २२१**

मिळकतकराची थकबाकी वसूल होण्यासाठी व पालिकेचे उत्पन्न वाढीसाठी मिळकत कर अभय योजना राबविणेबाबत मा.ॲड्.अविनाश साळवे यांचे दि.२०/११/२०१९ चे पत्रावर झालेला मा.स्थायी समिती ठराव क्र. १५९० दि. २६/११/२०१९, मा.विशाल धनवडे व मा.प्रमोद ओसवाल यांचे दि.६/२/२०१९ चे पत्रावर झालेला मा.स्थायी समिती ठराव क्र. २४७१ दि. १४/२/२०१९, मा.ॲड्.अब्दुल गफुर अहंमद पठाण यांचे दि.१५/१/२०२० चे पत्रावर झालेला मा.स्थायी समिती ठराव क्र. २०६९ दि. २१/१/२०२० ला अनुसरुन मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/टीजीओ/११३० दि.२४/२/२०२० ने पाठविलेला अभिप्राय विचारासाठी.

(टिप : सदर विषयाचा विचार १ महिन्यानी करावा असे दि. १२/५/२०२० च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. २२२**

मा.दिपक मानकर व मा.भैय्यासाहेब जाधव यांचे दि. ७/१/२०२० चे पत्र.

पुणे महानगरपालिकेचा मिळकत कर वेळेत न भरल्यास प्रतिमहा २ टक्के दंड आकारला जातो. म्हणजेच एका वर्षात २४ टक्के इतका दंड आकारला जातो. दंडाची ही रक्कम जाचक असून नागरिकांकडून दंडाची रक्कम कमी करणेबाबत अनेकवेळा मागणी केली जाते. पुणे महानगरपालिकेकडून पूर्वी मिळकत कराची अभय योजना राबवून दंडाच्या रकमेतून सूट देण्यात आली होती. यावेळी पुणे महानगरपालिकेस कोटयावधी रूपयांचे उत्पन्न मिळाले होते. वास्तविक मिळकत कराची पावती प्राप्त न झाल्याने अनेक नागरिकांकडून मिळकत कर वेळेत भरला जात नाही. तद्नंतर दंडाची जाचक रक्कम मिळकत करात समाविष्ट होवून मिळकत कराची रक्कम जास्त असल्याने गोरगरीबांना सदर रक्कम भरणे शक्य होत नाही. पर्यायाने दंडाची रक्कम वाढत जाते. सद्यस्थितीत नवी मुंबई महानगरपालिकेने मिळकत कराबाबत अभय योजना राबविली असून त्याच धर्तीवर पुणे महानगरपालिकेने मिळकत कराबाबत अभय योजना राबवावी.

सबब गोरगरीब नागरिकांसाठी निवासी मिळकत कराबाबत पुणे महानगरपालिकेने अभय योजना राबवावी.

(टिप : सदर विषयाचा विचार १ महिन्यानी करावा असे दि. १२/५/२०२० च्या सभेत ठरले होते.)

**नगरसचिव,**
**पुणे महानगरपालिका.**

(टिप :– प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयांची कागदपत्रे (डॉकेटस) नगरसचिव यांच्या कार्यालयात वाचण्यासाठी ठेवली आहेत.)

**सुचना – कोरोना विषाणूमुळे उद्भवलेली परिस्थिती विचारात घेवून मे.केंद्र व राज्य शासनाच्या आदेशाचे तंतोतंत पालन करावे ही विनंती.**